(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. IX / Issue – IV ISSN 2277-8063

# “अदिवासी समुदायातील उच्च शिक्षणातील गतिशीलतेचा समाजशास्त्रीय अभ्यास”

**श्रीमती कल्पना पुरुषोत्तम कोकणी,** संशोधक विद्यार्थिनी, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**प्रस्तावना -**

अदिवासी समाज हा भारतातील एक महत्वपूर्ण समाज म्हणून ओळखला जातो. हा समाज अनेक वर्षापासून जंगलात वास्तव्य करीत होता, या समाजाचा सामाजिक, अर्थीक आणि सांस्कृतिक विकास झालेला दिसून येत नाही. कोणत्याही समाजाचा विकास हा त्या समाजातील शैक्षणिक प्रगतीवर अवलंबून असतो. शिक्षणाचा प्रसार जेवढा अधिक तेवढीच त्या समाजाची प्रगती असे समीकरण होते. शिक्षणाची प्रसार जसजसा वाढत जाईल तसतसा त्या समाजाच्या विचारसरणीत आणि राहणीमानात वेगळेपण दिसून येते. नंदुरबार जिल्यातील अदिवासी समाजाची उच्च शैक्षणिक स्थिती अभ्यासायची झाल्यास या समाजाची उच्च शैक्षणिक स्थिती फारशी विकसित आणि सुधारलेली दिसून येत नाही असे दिसून येते. याचे कारण म्हणजे अदिवासी समाज हा उपेक्षित आणि जंगल, दरया खोर्यात राहत असल्याने या समाजाचा शैक्षणिक क्षेत्रात फारसा विकास झालेला दिसून येत नाही ग्रामीण भागामध्ये निरक्षरतेचे प्रमाण शहरी भागाच्या तुलनेत अधिक आहे असेही दिसून येते . आदिवासी समाज दुर्गम अशा डोंगराळ प्रदेशात राहत असल्याने शिक्षणाची विशेषतः आदिवासी विकास विभागाची शैक्षणिक गंगा तळागाळापर्यंत पोहचली असे म्हणता येत नाही. राज्यात आदिवासी विभागाच्या ५०० च्या वर आश्रमशाळा आहेत. परंतु, त्या ठिकाणी विद्यार्थी केवळ पोटार्थी म्हणून येतो.

अदिवासी समाजातील पदवीधर सदस्यांमध्ये शहरी भागातील सदस्यांचे प्रमाण हे अधिक आहे. हे प्रमाण ग्रामीण भागातील सदस्यांपेक्षा अधिक आहे ग्रामीण भागातील अदिवासी समाजाच्या विदयार्थ्यांमध्ये माध्यमिक शिक्षणापर्यंत शिक्षण घेतलेल्यांची संख्या लक्षणीय आहे. पण त्यापुढे शिक्षणाचे प्रमाण उच्च-पदव्युत्तर शिक्षणापर्यंत कमालीची घट होत असल्याचे दिसून येते. अदिवासी समाजात सामाजिक प्रगतीमध्ये शिक्षणाला फारसे प्राधान्य क्रम दिला जात नाही. अदिवासीचे खडतर जीवन व त्यांचा जंगली वस्तूवर आधारित व्यवसायामुळे काही मुलांना अर्ध्यावर शिक्षण सोडावे लागते. तसेच काही दुर्गम भागात शाळा-कॉलेजचे अंतर जास्त असल्यामुळे मुले शाळेत जात नाहीत. त्यामुळे अदिवासीसमाजातील व्यक्तींचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन उदासिन आहे. आज अदिवासी लोकांकडे अनेक कौशल्य आहेत पण शिक्षणाचा अभाव व भूगोलिक विकास, सांस्कृतिक विकासाचा अभाव यामुळे त्यांना इतर कोणताही जगण्याचा पर्याय नाही. आधुनिक दुनियेच्या झगमगटापासून आजही अनेक लोक कोसो दूर आहेत. अनेक वर्षांनंतर संयुक्त राष्ट्रसंघासमोर जी बाब समोर आली ती अतिशय धक्कादायक होती. ती बाब म्हणजे जगातील अनेक मूळ निवासी समुहांनी निसर्ग जपण्याचे मोलाचे कार्य केले. परंतु आधुनिक समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊ न शकल्यामुळे या आदिम जमाती शिक्षण, आरोग्य, रोजगार व इतर अनेक सोयीसुविधा पासून वंचीत राहिले आहेत. या गोष्टींचे गांभीर्य लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र संघाने 9 ऑगस्ट 1994 या दिवशी जागतिक आदिवासी दिवस म्हणजेच International Day of Indigenous People घोषित केला.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

1) अदिवासीसमुदायातील उच्च शिक्षणाच्या स्थितीचा अभ्यास करणे.

2) अदिवासीसमुदायांमध्ये उच्च शिक्षण न घेतल्यामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आला आहे.

**तथ्य संकलन -**

प्रस्तुत शोध निबंधासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन स्त्रोतांचा वापर केला आहे. यामध्ये मुलाखत अनुसूची, संदर्भ पुस्तके, मासिके, नियतकालिके, शासकीय अहवाल, मराठी विश्वकोश खंड, वर्तमानपत्रातील कात्रणे यांचा वापर करण्यात आला.

**सारणी क.1**

**अदिवासी सदस्यांची शैक्षणिक स्थिती**

| अ.क्र. | शैक्षणिक स्थिती | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | निरक्षर | ८७ | २१.४ |
| 2 | प्राथमिक शिक्षण | १३९ | ३४.२ |
| 3 | माध्यमिक शिक्षण | ५५ | १३.५ |
| 4 | उच्च माध्यमिक शिक्षण | ४८ | ११.८ |
| 5 | पदवीधर | ४२ | १०.३ |
| 6 | पदव्युत्तर | २८ | ६.९ |
| 7 | इतर | ८ | २.० |
| | एकूण | ४०७ | १००.०० |

संदर्भ : फिल्ड सर्वे

प्रस्तुत संशोधन क्षेत्रातील एकूण ४०७ उत्तरदात्यांची शैक्षणिक स्थितीचे वर्गीकरण केले आहे त्यानुसार प्राथमिक शिक्षण असणारे एकूण उत्तरदात्यांचे प्रमाण १३९ (३४.२ %) टक्के आलेले आहे. पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या उत्तरदात्यांचे एकूण प्रमाण २८ (६.९ %) इतके आहे यावरून उच्च शिक्षणातील अदिवासीसमुदायातील उत्तरदात्यांचा सहभाग अत्यल्प असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

अदिवासीसमुदायांमध्ये शिक्षणाचे प्रमाण फारसे चांगले नाही. शैक्षणिक प्रबोधनाचा अभाव, दुर्गम भागात शाळा कॉलेजचे अंतर घरापासून जास्त असल्यामुळे, शिक्षण अर्ध्यावर सोडले असले कारणाने, बिकट आर्थिक परिस्थिती, शैक्षणिक प्रेरणेचा अभाव, शैक्षणिक योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी न होणे या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणजे अदिवासीसमुदाय शिक्षणापासून वंचित राहिल्याचे दिसून येते. अदिवासी समुदायाचा शैक्षणिक दर्जा पाहताना असे दिसून येते की कोणत्याही समाजाचा विकास हा त्या समाजातील शैक्षणिक प्रगतीवर अवलंबून असतो. अदिवासीसमाजाची शैक्षणिक स्थिती फारशी सुधारलेली नाही. जगापासून लांब असलेला आणि स्वताच्या व्यवसायात गुंतलेला हा समाज शिक्षण क्षेत्रात विकसित झालेला नाही. प्राथमिक शिक्षणात ही ग्रामीण भागातील अदिवासीसमाजातील उत्तरदात्यांचे प्रमाण शहरी भागातील उत्तरदात्यांपेक्षा अधिक आहे. उच्च पदव्युत्तर व्यक्तींचे प्रमाण ग्रामीण भागामध्ये शहरी भागापेक्षा कमी आहे पण यामध्येही फार मोठी तफावत नाही. एकंदरीत पाहता दोन्ही भागांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. शिक्षणामुळे विकासाची दारे उघडतात सामाजिक गतिशीलता वाढते, पण अदिवासी समाजात निश्चितच शहरी भागात शिक्षणाचा वेग हा ग्रामीण भागापेक्षा अधिक आहे पण या प्रवाहाची व्याप्ती वाढणे आवश्यक आहे.

**अदिवासी समाजातील शिक्षणाच्या समस्या**

१. अदिवासी समाजातील दारिद्र्य, धर्मभोळेपणा, अंधश्रद्धा आणि अज्ञान.

२. आधुनिकतेचा अभाव

३. मुलींच्या शिक्षणाबद्दल उदासीनता

४. बोली भाषेची समस्या

५. व्यवसायाला प्राधान्य

६. शाळांचे अनाकर्षण

७. राजकीय अनास्था

८. शिक्षणाचा प्रसार कमी

९. शिक्षण आणि जगन यांच्यात मेळ घालता येत नाही

१०. संपर्क साधनाचा अभाव

**निष्कर्ष -**

1. संशोधन क्षेत्रातील एकूण ४०७ उत्तरदात्यांची उत्तरदात्यांपैकी २८ (६.९ %) अत्यल्प उत्तरदाते पदवीधर व पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता धारण केलेले आहेत.
2. संशोधन क्षेत्रातून निवडलेल्या एकूण उत्तरदात्यांच्या शैक्षणिक गतिशीलतेचे अध्ययन केले असता असे दिसून आले की ग्रामीण उत्तरदात्यांपेक्षा शहरी उत्तरदात्यांमध्ये शैक्षणिक गतिशीलता व त्याचे प्रमाण अधिक आहे.
3. संशोधन क्षेत्रातून निवडलेल्या एकूण उत्तरदात्यांपैकी अधिक उत्तरदात्यांच्या कुटुंबात कोणीही उच्चशिक्षित नाही.

उपरोक्त प्राप्त निष्कर्षांवरून असे प्रतिपादित होते की भारताने नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारले आहे पण अदिवासीसमाजातील लोक अजूनही उच्च शिक्षणाच्या प्रवाहात पूर्णतः आलेले नाहीत. आदिवासी समाज आज प्रगतीसाठी धडपड करतो आहे. या समाजातील मुले उच्च शिक्षण, चांगल्या रोजगाराची स्वप्ने बघताहेत. त्यांना साथ हवी आहे ती सरकारी यंत्रणांची.

**शिफारशी -**

1. अदिवासी समाजाला शिक्षणाच्या संदर्भात अनेक सवलतींचा लाभ प्रभावीपणे करून दिला पाहिजे.
2. अदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी उच्च शिक्षणाच्या संदर्भात असणाऱ्या सर्व योजना पारदर्शकपणे राबविल्या पाहिजे.
3. अदिवासी समाजामध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढवण्यासाठी शासनाने तसेच अशासकीय संस्थांनी प्रबोधन करणे आवश्यक आहे.

४. आज आदिवासी समाजात उच्च शिक्षण घेणारा वर्ग पुढे येवू पाहत आहे, मात्र त्यातील बरेचजण बेकार आहे. शासन आणि आदिवासी राज्यकर्त्यांकडे याविषयी डाटा नाही. बेकारीची कुऱ्हाड या उच्च शिक्षितांवर कोसळली नव्हे ती घाव घालून दारिद्र्याकडे नेत आहे. आदिवासी राज्यकर्त्यांनी आपल्या बांधवांचे दुःख पाहण्याचे धारिष्ठ्य दाखवावे.

**समारोप**

जो समाज वंचित आहे आणि प्रवाहाच्या बाहेर आहे , जे पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठी रानावनात भटकतात, त्या आदिवासी समाजातील चिमुकल्यांच्या, मुलांचा, युवकांच्या भविष्याचा विचार शासनाने करायला हवा. राज्यस्तरीय बैठक आणि युद्ध पातळीवर उपाय योजना करून आजच्या स्पर्धेच्या युगात हा समाज शिक्षणापासून वंचित राहू नये याबाबत लवकरात लवकर उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**संदर्भ सूची -**

१ . गोविंद गारे (१९७५), आदिवासींचे प्रश्न , आदिम प्रकाशन, पुणे

२. आकारे बी. एन. (२००९) अदिवासी आणि सामुदायिक विकास योजना, पिम्पालापुरे बुक प, प्रकाशन, नागपूर

३ . देशमुख, सुदर्शन (१९७५) अदिवासी समाजाचे दारिद्र्य, निर्मल प्रकाशन, नांदेड

४ . https://maharashtratimes.com/editorial/article/adivasi-din/articleshow/53605479.cms

५ . https://www.esakal.com/vidarbha/no-school-no-education-tribal-children-have-not-smart-mobiles-online-education-320333